**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, MAR-APRIL, 2021, VOL- 8/64*

# शाश्वत विकास आणि भारत

**डॉ. विश्वनाथ तुकाराम कोक्कर**
*अर्थशास्त्र विभाग प्रमुख, राजर्षी शाहु कला व विज्ञान महाविद्यालय,*
*वाळुज ता. गंगापुर जि. औरंगाबाद*

**Abstract**

कोरोना नंतर भारतात शाश्वत विकास विकासाची सर्व समावेशक संकल्पना असुन यामध्ये भावी पिढ्यांच्या अस्तित्वाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. देशातील साधन सामग्री, संसाधने, पर्यावरण, हवामान बदल, भांडवल, उर्जा, रोजगार उत्पादन इत्यादी विषयी शाश्वत विचार ठेऊन शाश्वत विकास साधण्यासाठी नवप्रवर्तनशील संकल्पना आहे. देशातील जमीन, वने, पाणी, हयासंबंधी सर्वसमावेशक विचार या शाश्वत विकासामध्ये केलेला आहे. देशाच्या आर्थिक विकासाबरोबरच समाजिक समावेशकतेला चालना देणारा हा विकास होय. भारताला शाश्वत विकासाची नितांत गरज असुन भारतात शाश्वत विकासाकरिता विशेष असे प्रयत्न केले जात आहे. देशातील हवामान बदल, भांडवल, रोजगा, उत्पादन यांच्यातील परिवर्तनाबरोबरच दारिद्रयनिर्मुनाकरिता मानवी विकासा करिता शाश्वत विकासाला पुरक असे प्रयत्न भारत सरकार द्वारा केले जात असतांना दिसुन येत आहे. शाश्वत विकास साधतांना देशातील दुर्गम भागातील राज्य यांच्यात शाश्वत विकासाच्या दृष्टिने प्रयत्न होणे गरजेचे आहे. तसेच देशातील पर्यायी व पुरक साधनांचा वापर मानवीकल्याणाच्या दृष्टिने शाश्वत विकास शाश्वतपणे होणे आवश्यक आहे.

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**शाश्वत विकासाची संकल्पना-**बुडलैंड अहवाल "भविष्यकालीन पिढ्यांच्या स्वतःच्या गरजा पुर्ण करण्याची क्षमता अबाधीत राखुन सध्याच्या गरजांची पुर्तता करणारा विकास म्हणजे चिंरतन विकास होय."

रॉबर्ट ऍलन "मानवी गरजांचे समाधान चिरकाल टिकविणे आणि मानवी जिवनाचा दर्जा उंचावणे ही उद्दिष्टे साध करणारा विकास म्हणजे शाश्वत विकास होय."

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**संशोधन विषयाचे महत्त्व -** मानवाचा जसा विकास झाला या विकासाबरोबर देशातील साधनसामुग्रीचाही मोठ्या प्रमाणात वापर झालेला दिसुन येतो. मानव विकासाबरोबरच लोकसंख्याही मोठ्या प्रमाणात वाढत गेली आणि संसाधने मी मात्र पर्यायी उपयोगाने वापरण्यात येऊ लागली. परंतु विकास हा सुध्दा टिकाऊ असला पाहिजे येणाऱ्या भावी पिढ्यांच्या उपयोगाचा असला पाहिजे ह्या विचारांची गरज भासु लागली आणि "शाश्वत" टिकुन राहणाऱ्या विकासाची

संकल्पना पुढे आली. भारत देशातच नव्हे तर संपूर्ण जगात ह्या शाश्वत विकासावर भर देण्यात येऊ लागला आणि ह्या विकासाच्याव दृष्टिने जगभरात प्रयत्न करण्यात येऊ लागले. वर्तमान स्थितीतही ह्या विकासाच्या दृष्टिने वेगवेगळ्या परिषदा, मार्गदर्शक तत्त्वे, उद्दिष्टे आणि सनसाधनाच्या योग्य उपयोगाच्या दृष्टिने विवधि कार्यक्रम देशपातळीवर तसेच जगातील विविध देशात घेण्यात येत आहे असे दिसुन येते. म्हणुनच येणाऱ्या भावी पिढ्यांच्या हितांचा विचार करुन वर्तमानात संसाधनांचा योग्य वापर करुन "शाश्वत" असा विकास साध्य करण्याच्या दृष्टिने प्रयत्न केला पाहिजे असे दिसुन येते. भारतातही शाश्वत विकासा "या दृष्टिने सरकार प्रयत्नशील आहे असे दिसुन येते. आणि तो केला पाहिजे ही आता काळाची गरज आहे. म्हणून भारतात शाश्वत विकास झालाच पाहिजे असे वाटते.

**संशोधन विषयाची उद्दिष्टे -**

1. शाश्वत विकासाची गरज अभ्यासणे.
2. शाश्वत विकासाच्या दृष्टिने केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके**

1. शाश्वत विकासाचे महत्त्व अभ्यासण्याची गरज वर्तमान पिढीला निर्माण झाली आहे.
2. शाश्वत विकासाकरिता देशात प्रयत्न होत आहे.

**संशोधन पद्धती -**सदरील संशोधनी निबंधाकरिता वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशाधन पद्धतीचा अवलंब करून ह्या संशोधना करिता दुय्यम साधन सामग्रीचा उपयोग करण्यात आलेला आहे. ह्या मध्ये प्रस्तके, वर्तमानपत्रे, संशोधन लेख, मासिके, प्रकाशित अहवाल, इंटरनेट इत्यादी साधनांचा उपयोग केलेला आहे.

**शाश्वत विकासाची गरज आणि भारत" " भारत जगात इतर विकासाच्या बाबतीत:** अग्रेसर म्हणुन ओळखला जातो त्याच प्रमाणे तो मोठ्या लोकसंख्येचा देश म्हणुन ओळखला जातो. त्यामुळे भारतात लोकसंख्येबरोबरच गरजाही मोठ्या प्रमाणात दिसुन येतात. या गरजांच्या पुर्ततेबरोबरच येणाऱ्या भावी पिढ्यांच्या गरजांचाही विचार होणे अवश्यक वाटते. म्हणुन शाश्वत विकासाची भारताला गरज आहे असे वाटते. भारतता वर्तमानात शुद्ध व सुरक्षित पेयजल ही गरज सर्वात अग्रगण्य आहे.

उत्पनादन व उपभोग प्रक्रियेत पाण्याचा वापर तसेच घरघुती कामे, शेती, उद्योग धंदे इत्यादी करिता पाण्याची गरज असते. आज ही भारता सारख्या विकसनशील देशात कित्येक राज्यात शुद्ध पेयजल पुरवठा होत नाही. उदा. राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार, महाराष्ट्र, दुर्गम भागातील राज्य इत्यादी आणि काही राज्यात पाण्याच्या अतिरिक्त वापरामुळे पाण्याचे संकट निर्माण झाले आहे असे दिसुन येते. उदा. पंजाब, हरियाणा, राज्यात दुसऱ्या हरितक्रांतीमुळे त्याराज्यातील शेती मध्ये अतिरिक्त पाणी आणि खतांचा अतिरिक्त वापर झालेला दिसुन येतो. भावी पिढ्यांच्या दृष्टिने ही बाब गंभिर आहे असे वाटते. शेती क्षेत्रातील गरज पुर्ततेसाठी, जलसिंचनासाठी पाण्याचा प्रचंड वापर केला जात आहे. मोठ्या प्रमाणात पाण्याचा उपसा होत आहे आणि भुजलपातळी ही खालावत आहे. ह्या बाबी थांबविण्यासाठी शाश्वत विकासाची गरज आहे. शाश्वत विकासाचा विचार करून भावी पिढ्यांसाठी पेयजल साठी सुरक्षित राहतील अशी अपेक्षा आहे.

वर्तमान स्थितीमध्ये जगा मध्ये दुसरी महत्त्वाची समस्या म्हणजे हवा प्रदुषण होय. मानव आथिर्क विकास साधतांना विविध उद्योग विविध वस्तुंच्या निमिर्ती करिता निर्माण करित आहे. आणि आथिर्क विकास साध्य करण्याचा प्रयत्न करित आहे. परंतु यादृष्टिने विचार करता हावा प्रदुषण मोठ्या प्रमाणात निर्माण होत आहे, ही जे भावीपिढ्यांकरिता घातकच आहे आणि यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शाश्वत विकासाची गरज आहे. देशात योग्य विकास साधायचा असेल तर विकास होत असताना कोणत्याही प्रकारे प्रदुशण होणार नाही ओझोन ला हानी निर्माण होणार नाही याची काळजी घ्याची लागणार आहे. देशात निर्माण होणारी उर्जा आणि त्यानुसार असणारी मागणी आणि पुरवठा व्यस्त प्रमाणात आहे. परिणाम उर्जेच्या कमतरतेमुळे प्रश्न निर्माण होत आहे. याकरिता सौरउर्जा, पवन उर्जा यासारख्या नवीकरणशमऊर्जा साधनांच्या वापराची गरज आहे. त्याचप्रमाणे सामाजिक व आथिर्क कल्याणासाठी आथिर्क वृद्धिदरअधिक असणे आवश्यक आहे. कारण ह्यामुळे बेकारी आणि दारिर्द्य हे कमी होते. परिणामी पर्यावण रक्षण होऊ एकूण उत्पादन वृद्धीदर वाढविण्याकरिता जमीन, वने, पाणी यांची योग्य व्यवस्थापन होऊन आणि याकरिता शाश्वत विकासाची गरज आहे.

अर्थव्यस्थेत विकासाकरिता भांडवलाला अनन्य साधारण महत्त्व आहे. मानवाला देखील त्या-त्या देशाचे मानवी भांडवल म्हणुन ही संबोधले जाते. म्हणून ह्या मानवी भांडवलाच्या संवर्धनासाठी शिक्षण प्रशिक्षण, आहार, आरोग्य, राहणीमान, इत्यादी बाबीचा शाश्वत विकासाच्या दृष्टिने अभ्यास करणे अवश्यक आहे. याच बरोबर भौतिक साधन सामुग्रीचाही सुयोग आणि पर्यायी वापर होऊन शाश्वत विकासाकरिता साधन संपत्तीचे योग्य नियोजन होणे अवश्यक आहे. तसेच कार्बनचे वाढते प्रमाण व ओझोनचा घटता स्तर ह्याचा विचार करता शाश्वत विकासाची मोठ्या प्रमाणात गरज वाटते. थोडक्यात

पर्यावरण रक्षण, जैवविविधतेचे रक्षण, हवामानातील बदल, गरीबी निर्मुलन व सामाजिक समावेशकतेला तसेच आर्थिक वाढीस चालना देण्यास शाश्वत विकासाची गरज वाटते.

**"शाश्वत विकासाकरिता प्रयत्न आणि भारत":** शाश्वत विकास साध्य करण्यासाठी विविध देशात जागतिक पातळीवर जसे प्रयत्न केले जात आहे त्याच प्रमाणे भारतातही विविध देशांच्या परिषदांमध्ये भाग घेऊन शाश्वत विकास कसा साधता येईल याकरिता प्रयत्न केले जात आहे.2015 सप्टेंबर मध्ये संयुक्तराष्ट्र महासभेने आयोजित 17 व्या संमेलनात भारताने भाग घेऊन शाश्वत विकासाच्या उद्धिट पुर्ती व उत्तेजनाकरिता प्रयत्न केलेले दिसुन येतात. की ज्यामध्ये गरिबी निर्मुलन, समानतेचा सामना, लिंगभाव समानता व महिला आणि बालिका सबलीकरण, आरोग्य आणि शिक्षणात सुधारणा, शहरांना आर्थिक टिकाऊ बनविने, हवामान बदलावर नियंत्रण, महासागर आणि जंगल संरक्षण, निरंतर विकासात भागीदारी, सामाहिक व आर्थिक तसेच पर्यावरण पैलुंचेएकीकरण, उत्कृष्ट गुणवत्ता क्षमतेला प्रोत्साहन इत्यादी उद्दिष्ट पुर्तीसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न भारत सरकार कडून होऊन शाश्वत विकासाच्या करिता मोठा सहभाग घेतलेला आहे.

हवामान बदलावर 2015 मध्ये भारताने संयुक्तराष्ट फ्रेमवर्क कन्व्हेन्शन या अंतर्गत 21 वे संमेलन डिसेंबर 2015 मध्ये पॅरिसमध्ये आयोजित करून, "पॅरिस करार" करण्यात आला होता. त्यानंतर क्योटो करार ³ÖÖ¸üŸÖ आणि जपान यांच्यात करण्यात आला होता. तो एक शाश्वत विकासाच्या अनुषंगाने केलेला करार होता. भारताचा शाश्वत विकास आणि हवामान बदल याबाबत सकारात्मक परिणाम म्हणुन भारताने याकरिता 'वित्तीय व्यवस्था हे देखील आव्हान पुर्ण करण्याचा प्रयत्न 18 व्या वित्त आयोगामार्फत केलेला आहे. हया वित्त आयोगामार्फत धोरण निमिर्ती प्रक्रियेत हवामान बदलाला एक महत्त्वपुर्ण घटक मानुन हवामान बदल नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच 11 जुलै 2017 मध्ये न्युयॉर्क येथे आयोजित केलेल्या शाश्वत विकासावरील संयुक्त राष्ट्राच्या उच्चस्तरीय राजकीय फोरम मध्ये भारताने आपला पहिला अहवाल सादर केलेला आहे. की ज्यामध्ये शाश्वत विकासाच्या 8 ध्येयांचा समावेश होता. तसेच वर्तमान स्थिती मध्ये 18-19 सप्टेंबर 2021 रोजी न्यूयॉर्क मध्ये होणाऱ्या शिखर परिषदेत भारत भाग घेणार आहे. आणि 2030 पयंर्त परिवर्तनशील आणि प्रवेगक कृतीवर उच्चस्तरीय राजकीय मार्गदर्शनासह शाश्वत विकासाच्या उद्दिष्टंच्या दिशेने वाटचाल करणार आहे.

**"शाश्वत विकास व भारतात राबविल्याजाणाऱ्या योजना":** वर्तमान स्थितीमध्ये भारत सरकाने शाश्वत विकासाकरिता विविध योजना आणि उपक्रम राबविण्यासाठी प्रयत्न केलेले दिसुन येतात. यामध्ये स्वच्छ भारत अभियान मिशन, बेटी बचाओ बेटी पढाओ कार्यक्रम, प्रधानमंत्री आवास योजना,

प्रधानमंत्री जन-धन योजना, दिनदयाळ उपाध्याय ग्रामजोती योजना, प्रधानमंत्री उज्वला योजना, सर्व शिक्षा अभियान, नमामी गंगे अभियान, सशक्त भारत अभियान इत्यादी.

**"निष्कर्ष":** वर्तमान विकास आणि भारतातील परिस्थीती यांचा अभ्यास करता असे दिसुन येते की, भारतातील वर्तमान भविष्यकालीन परिस्थीती विचारात घेता शाश्वत विकासाकरिता भारतता मोठ्या प्रमाणात विविध शाश्वत योजनांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. शाश्वत विकासाच्या धारणांची अमलबजाणी करताना प्रशासन, जनता, संशोधक, उद्योजक, नवप्रवर्तक, यांनी विशेषतः प्रयत्न करणे गरजेचे आहे. देशात शाश्वत विकासाकत्मता विशेष अशा निधीची तरतुद देखील करणे आवश्यक आहे. देशातील विविध भागात असलेल्या शाश्वत विकासाच्या दृष्टिने उणीवा ह्या दुर करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. थोडक्यात समाज आणि समाजातील वातावरण यांच्यात अधिक समाधानकारक संबंध निर्माण करण्यासाठी व संभाव्य संघर्ष कमी करण्यासाठी व संसाधनांच्या वापरामुळे जे बदल घडू शकतात त्यानुसार बदल करणे आवश्यक वाटते. तसेच भविष्यकालीन पिढीच्या विकासाकरिता भारत देशात अधिक प्रयत्न होतील अशी अपेक्षा आहे.

**संदर्भ :**


1. जिभकाटे, बी.एल., शास्त्री सुधाकर भारतीय अर्थव्यवस्था विश्व पब्लिशर्स अँड डिष्टीबुटर्स, महाल, नागपुर - 440032.
2. रायखेलकर ए.आर., दामाजी बी. एच. भारतीय अर्थशास्त्र विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगपुरा, औरंगाबाद,
3. साठे मधुसुदन नव्या जगाचे अर्थकारण' डायमंड पब्लैकेशन, 1691, सदाशिव पेठ, शंकर प्रसाद, कॉ ऑपरेटिव्ह सोसायटी, तिसरा मजला टिळक रोड पुणे -411030.
4. शर्मा ओ.पी. 'भारत मे नियोजित विकास और आथिर्क उदारिकरण' आर.बी.एस.ए. पब्लिशर्स हायवे, जयपूर -302003
5. रेड्डी श्रीनाथ के.: शाश्वत विकासात आरोग्याचे स्थान 'योजना' फेब्रुवारी 2016 अंक 4.
6. जावडेकर प्रकाश: पॅरिस कराराचे भारताकडुन प्रामणिक पालन' 'योजना' जानेवारी 2020 अंक 6.
7. मेश्राम सिद्धाथ:र् हवामान बदल आणि शाश्वत विकास एक ज्वलंत समस्या इंटरनॅशनल जर्नल ऑफ क्रिएटिव्ह रिसर्च थॉट, एप्रिल 2012, हॉल्युम अंक 6.
8. www.ijcrt.org
9. https://www.un.org
10. https://www.indiabudget.gov.in